KHARADE AGRO
Agriculture with a New Skill

# खराडे ॲग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: साहा || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि. ०१ जुलै २०२४


## कृषी दिनाच्या आमच्या सर्व शेतकरी बांधवांना खूप खूप शुभेच्छा!





हरित क्रांतीचे प्रनेते, माझी-मुख्यमंत्री वसंतराव नाईक

### कृषी जगतातील विशेष घडामोडी

- कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापरातून उसाचे उत्पादन वाढविणारा देशातील पहिला प्रयोग यशस्वी झाला आहे. बारामती ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मायक्रोसॉफ्ट आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या माध्यमातून विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचे शनिवारी (ता. २२) ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.
- अकोला शेतकऱ्यांना २४४ कोटी पीक कर्जाचे वितरण; १६ टक्के उद्दिष्टपूर्ती. खरीप हंगामासाठी देण्यात येणाऱ्या पीक कर्जाचे जिल्ह्यात संथ गतीने वाटप सुरू आहे. चालु खरीप हंगामासाठी १ हजार ५०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले.

महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै रोजी, महाराष्ट्र कृषी दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राच्या हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिनानिमित्त साजरा केला जातो. भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. महाराष्ट्र हे देशातील प्रमुख उत्पादक राज्य म्हणून गणले जाते. कारण भारत अनेक उत्पादनांसाठी महाराष्ट्रावर अवलंबून आहे. ओला-दुष्काळ, कोरडा-दुष्काळ, आसमानी आणि सुलतानी संकटांमुळे राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था दयनीय होत असून, दरवर्षी शेतकरी आत्महत्येचा आकडा वाढतो आहे. अशा परिस्थितीत शेती, माती आणि शेतकऱ्यांशी संबंधित सगळ्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी कृषी दिवस एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देतो!

**कृषी दिनाचा नेमका इतिहास काय आहे?**

राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या स्मृतीदिना निमित्त महाराष्ट्र कृषी दिन साजरा केला जातो. वसंतराव नाईकांना महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे जनकही म्हटले जाते. **(पूर्ण वाचा- पान नं. २ वर)**



**|| पुढील पानावर ||**


- देशी गायी; जाती-प्रजाती
- भारतात शेती का महत्त्वाची आहे?
- यशोगाथा
- बोल अनुभवाचे



Plot No G 251, M.I.D.C. Baramati
9309253091 || 9209317742

# खरे कृषीधन; चला करूयात देशी गायींचे संवर्धन!



शेती ही भारताची मुख्य आर्थिक शक्ती आहे. शेती सोबतच पशु-पालन देखील शेतकऱ्याच्या जीवनातील अविभाज्य भाग आहे. त्यात देशी गायींबद्दल सांगायचं झालंच तर यापाळीव प्राण्याला लाभलेले सांस्कृतिक, वैद्यकीय, धार्मिक, औद्योगिक तसेच अध्यात्मिक महत्त्व प्रचंड आहे. विशेष म्हणेज शेतीला परिपूर्णता प्राप्त करून देण्यासाठी देखील गायीचे असलेले महत्व हे अनन्य साधारण आहे!

वैज्ञानिक क्षेत्रात गाईला 'बॉस इंडिकस' म्हणून ओळखलं जातं. सस्तन जातीच्या या देशी गायीची मुख्य ओळख अशी आहे की आकर्षक शिंगे, पाठीवर कुबड(ज्याला आपण 'वसंड' म्हणतो), मध्यम-टोकदार आणि बहुतेक लटकते कान असतात व लांबसडक शेपटी.



देशी गाय ही नैसर्गिक शेतीचा पाया आहे. देशी गाईच्या एक ग्रॅम शेणात जमिनीसाठी उपयुक्त ३०० ते ५०० कोटी सूक्ष्मजीव आढळतात. हे सूक्ष्मजीव जमिनीची सुपीकता वाढविण्याचे काम करतात. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता देखील वाढवतात. जमिनीत नैसर्गिकरित्या आढळणारे जिवाणू मातीला मुरड घालण्यास मदत करतात. त्यातील हवेची जागा वाढवतात. यामुळे माती हळूहळू सुपीक होऊन नैसर्गिकरित्या मजबूत बनते. गोवंश संवर्धनातून खत निर्मिती, बायोगॅस निर्मिती यांसारख्या अनेक योजनांना चालना मिळते. नैसर्गिक खतांमुळे शेतजमिनी सुपीक होतात.

नैसर्गिक शेती अंतर्गत तयार केलेल्या उत्पादनांमध्ये जीवामृत, घंजीवामृत, बीजामृत इत्यादी तयार करण्यासाठी स्थानिक शेण आणि गोमूत्र आवश्यक असते. त्याचप्रमाणे नीमस्त्र, अग्निस्त्र, ब्रह्मास्त्र, कडुनिंब, दशपर्णी अर्क, सप्तधान्य इत्यादी तयार करताना स्थानिक शेण व गोमूत्र, गूळ, बेसन, विविध प्रकारची धान्ये व घरोघरी उपलब्ध धान्ये यांची आवश्यकता असते. वनस्पतींचे विविध प्रकारच्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी तयार केलेल्या उत्पादनांमध्ये स्थानिक गायीच्या गोमूत्राचे विशेष महत्त्व आहे. अश्या या गौमातेला शेतजमिनीचे संरक्षक म्हणणं वावग ठरणार नाही!

देशी गायींच्या विविध जाती आहेत. या जाती महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मराठवाडा, म्हैसुर या ठिकाणी मुख्यत्वे आढळतात. डांग पर्वतरांगांमध्ये आढळणारी "डांगी" गाय, गीर व डांगी गाईंच्या संकरातून मराठवाड्यात उदयास आलेली "देवणी" गाय, सर्वोत्तम दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध असणारी "गीर" ही गाय, "पांढरे सोने" संभोधली जाणारी अत्यंत चपळ, काटक, व देखणी अशी "खिल्लारी" गाय, दुहेरी उपयुक्तता असणारी आणि दुष्काळ सदृश परिस्थितीशी सामना करुन तग धरून राहणारी "थारपरकर" गाय, प्रत्यक्षात मोहक तसेच कमी पावसाच्या प्रदेशात निकृष्ट अन्नावर पोषण होऊन देखील उत्तम गुणवत्ता सिद्ध करणारा "कांकरेज" गाय, दुधाची खाण म्हणून परिचित असणारा "साहिलवाल" गाय, राष्ट्रीय स्तरांवरील पशुप्रदर्शनांमध्ये अग्र मानांकने मिळवणारा "लालकंधारी" गाय अशा विविध नावं, रूपं असणाऱ्या जातींच्या गाईंचा भारतात समावेश होतो.

# भारतात शेती का महत्त्वाची आहे?




**GDP मध्ये योगदानः**
गेल्या काही दशकांपासून भारताच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचे योगदान कमी होत आहे, परंतु तरीही ते एक महत्त्वपूर्ण क्षेत्र आहे. अर्थव्यवस्थेच्या एकूण सकल मूल्यवर्धित (GVA) मध्ये शेतीचा वाटा 1990-91 मधील 35% वरून 2022-23 मध्ये 15% पर्यंत घसरला आहे. ही घसरण कृषी GVA मधील घसरणीमुळे नाही तर औद्योगिक आणि सेवा क्षेत्रातील GVA मध्ये वेगाने होत असलेल्या विस्तारामुळे झाली आहे.

**रोजगारः** शेती हा देशातील सर्वात मोठा रोजगार देणारा व्यवसाय आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय (NSSO), सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (MoSPI) द्वारे आयोजित नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण (PLFS) नुसार, 2022-23 मध्ये एकूण कर्मचाऱ्यांपैकी सुमारे 45.76% कृषी आणि संबंधित क्षेत्रात गुंतलेले आहेत.

**अन्न सुरक्षाः** भारत मुख्य अन्नधान्य, विशेषतः तांदूळ आणि गहू उत्पादनात मोठ्या प्रमाणावर स्वयंपूर्ण आहे. हे सुनिश्चित करते की देश आपल्या मोठ्या आणि वाढत्या लोकसंख्येला अन्न देऊ शकेल. भारत हा जगातील सर्वात मोठा दूध, कडधान्ये आणि मसाल्यांचा उत्पादक देश आहे. तांदूळ, गहू, कापूस, ऊस, शेतातील मासे, मेंढ्या आणि बकरीचे मांस, फळे, भाजीपाला आणि चहा या उत्पादनात भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**जमिन वापरः** भारतातील शेतजमीन ही देशातील एकूण भौगोलिक क्षेत्राच्या 50% पेक्षा जास्त आहे. जगातील कोणत्याही देशातील जमिनीचा हा सर्वाधिक वाटा आहे देशात सुमारे 195 मीटर हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे, त्यापैकी काही 63% पावसावर (अंदाजे 125 मीटर हेक्टर) तर 37% सिंचन (70 मीटर हेक्टर) आहेत.

**परकीय चलनः** (Foreign Exhange) भारताच्या परकीय चलनाच्या कमाईत कृषी निर्यातीचा मोठा वाटा आहे. तांदूळ, मसाले, कापूस, फळे आणि भाजीपाला यांसारख्या वस्तू जागतिक स्तरावर निर्यात केल्या जातात, ज्यामुळे महसूल निर्माण होतो आणि व्यापार तूट संतुलित होते. एप्रिल-जानेवारी 2024 मध्ये, कृषी उत्पादनांच्या निर्यातीचे एकूण मूल्य USD 38.65 अब्ज इतके होते. 2022-23 मध्ये, भारतातून कृषी निर्यात USD 52.50 अब्ज होती.

**सामाजिक-सांस्कृतिक आणि पर्यावरणीय स्थिरताः** भारताचा सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक जडणघडणीशी कृषी क्षेत्र खूप घट्ट गुंफलेले आहे. हे ग्रामीण परंपरा, सण आणि सामुदायिक जीवनाला आकार देते, सांस्कृतिक ओळख आणि ग्रामीण एकता जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. मातीची सुपीकता, पाणी आणि जैवविविधता यासारख्या नैसर्गिक संसाधनांचे जतन करण्यासाठी शाश्वत शेती पद्धती महत्त्वपूर्ण आहेत. पारंपारिक शेती पद्धती आणि आधुनिक तंत्रांचा उद्देश पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करणे आणि दीर्घकालीन शाश्वतता वाढवणे हे आहे.

Plot no. G 251, M.I.D.C. Baramati
9309253091 || 9209317742

# जाणून घेऊया, कशा झाल्या राहीबाई 'सीड मदर'?



पद्मश्री पुरस्कारप्राप्त राहीबाई पोपेरे

पद्मश्री पुरस्कारप्राप्त राहीबाई पोपेरे, या बचत गटाच्या (self-help group SHG) माध्यमातून ५० एकर पेक्षा जास्त जमिनीवर सेंद्रिय शेती करत आहेत. यामध्ये त्या 17 पेक्षा जास्त पिके घेत आहे.

सध्या आंबा मोहत्सावाच्या मध्यमातून पुन्हा एकदा प्रकाशझोतात आलेल्या, साधारणतः एक दोन वर्लाषांपूर्लवी लाल साडीत अनवाणी दिल्लीत पोहोचलेल्या राहीबाई पोपेरे यांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्याकडून देशाचा चौथा सर्वोच्च नागरी सन्मान, पद्मश्री मिळाला होता. राहीबाई सोमा पोपेरे यांना **'सीड मदर'** म्हणूनही ओळखले जाते. राहीबाई, वय ५७, महाराष्ट्रातील अहमद नगर जिल्ह्यातील छोट्या कोंबळे गावातील रहिवासी आहेत, त्या आदिवासी शेतकरी आहेत.

- **जाणून घेऊया त्यांचा शेती ते पद्मश्रीपर्यंतचा प्रवास-**

सुमारे २०-२२ वर्षांपूर्वी राहीबाईंच्या लक्षात आले की त्यांची नातवंडे आणि आजूबाजूच्या परिसरातील मुले खूप आजारी पडत आहेत. जास्त प्रमाणात कीटकनाशके आणि रासायनिक खतांच्या वापरामुळे हा प्रकार घडत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पारंपरिक पद्धतीनेच शेती करण्याचा निर्णय घेतला. राहीबाईंनी अशा देशी बिया गोळा करायला सुरुवात केली ज्यांना वाढण्यासाठी फक्त पाणी आणि हवा लागते. या बियाण्यांना रसायने आणि कीटकनाशकांची गरज नसते.

हळुहळु त्यांच्या मेहनतीमुळे त्यांच्या गावातील अनेक महिला त्यांच्या या प्रवासात सामील होऊ लागल्या. बचत गट तयार करून त्यांनी बियाणे बँक सुरू केली. अशा देशी बियाण्यांचे सुरक्षित वाण, जे शेतकऱ्यांना कमी सिंचनात चांगले पीक देऊ शकतात. यानंतर आजूबाजूच्या गावातील लोकांनी आणि कृषी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आणि त्यांचा सत्कारही केला.

3500 महिला 'सीड मदर' शी जोडल्या गेल्या आहेत. राहीबाई पोपेरे स्वयं-सहायता गट (SHG) मार्फत 50 एकरपेक्षा जास्त जमिनीवर सेंद्रिय शेती करत आहेत, ज्यामध्ये त्या 17 पेक्षा जास्त पिके घेत आहेत. आतापर्यंत 154 देशी बियांचे संवर्धन करण्यात आले आहे. त्यांच्याकडे तांदळाच्या काही जुन्या जाती आणि इतर धान्यांच्या बिया आहेत ज्या आता बाजारात उपलब्ध नाहीत.
राहीबाईंसारख्या व्यक्ती, देशात असलेल्या विविधतेचे संवर्धन करण्यास मदत करतात, आपल्याला त्यांच्यासारख्या आणखी लोकांची गरज आहे. राहीबाईंच्या योगदानाला खराडे ॲग्रो सलाम!

## || बोल अनुभवाचे ||

### श्री. सागर गोरे

खराडे ॲग्रोच्या फ्रूटनेटच्या वापरामुळे आमच्या शेतातील उत्पादनात प्रचंड वाढ झाली आहे. त्यांच्या नेटचा वापर करून आम्ही फळे वाऱ्यापासून व इतर कीटकांपासून सुरक्षित ठेवू शकतो. यामुळे आमच्या उत्पादनाच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे आणि आम्हाला अधिक चांगले बाजार मूल्य मिळाले आहे. खराडे ॲग्रो फ्रूटनेट माझ्यासाठी फायद्याचेच ठरले आहे.

### श्री. सुनील माडगे

माझ्या बागेतील फळांसाठी खराडे ॲग्रोच्या फ्रूटनेटचा वापर केल्यापासून आम्हाला फळमाश्या आणि पक्ष्यांपासून होणारे नुकसान जवळजवळ थांबले आहे. या नेटमुळे आमच्या फळांचे संरक्षण चांगल्या प्रकारे होत आहे आणि फळांची गुणवत्ता खूपच सुधारली आहे. खराडे ॲग्रोच्या फ्रूटनेटच्या मदतीने आमचे उत्पन्न नक्कीच वाढले आहे आणि आम्ही त्यांच्या सेवा तपर्तेमुळे खूपच समाधानी आहोत. प्रत्येक शेतकऱ्याने हे नेट एकदा नक्की वापरून पाहायला हवे.

पान नं. 1 वरून

(कृषी दिनाच्या आमच्या सर्व शेतकरी बांधवांना खूप खूप शुभेच्छा!)

१९६३ ते १९७५ या काळात ते राज्याचे मुख्यमंत्रीही होते. जेव्हा पासुन वसंत नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हापासुन त्यांनी कृषी क्षेत्राला चालना देण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी सदैव योगदान दिले असे सांगितले जाते.

या दिवशी राज्यभरात अनेक उत्सवांचे आयोजन केले जाते. भारतीय टपाल विभागाने शेत, शेतकरी आणि शेतातील प्राणी या थीमवर अनेक टपाल तिकिटे जारी केली आहेत.

हा दिवस राज्यातील शेतकऱ्यांना आणि कृषी क्षेत्राशी संबंधित समस्यांवर बोलण्यासाठी आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो. कृषी दिन शेतक-यांच्या दुर्दशेबद्दल मदत आणि जागरुकता वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांवर प्रकाश टाकतो.

खराडे ॲग्रोच्या वतीने कृषी दिनाच्या शुभेच्छा!

Plot no. G 251, M.I.D.C. Baramati | 9309253091 || 9209317742